# सारी सुख विसावली या झोपडीत माझ्या

**रमेश खानविलकर**

संस्थापक-संचालक : राजारामशेठ विद्यालय



'प्रयत्ने वाळूचे कण रगडीता...' या आशयाची म्हण आपण लहानपणापासूनच ऐकत आलो आहोत. मेहनत केली तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. ज्यांनी या म्हणीचा अर्थ आपल्या जीवनात उतरवला त्यांच्या आयुष्याचं सोनं झालं. भांडुपमधील राजारामशेठ विद्यालयाचे संस्थापक-संचालक रमेश खानविलकर यांनीही जीवनात खूप संघर्ष केला आहे. प्रथम स्वत:ला घडविण्यासाठी, स्वत:ला सिद्ध करण्यासाठी आणि नंतर शाळेचया उभारणीसाठी. आज त्यांची परीस्थिती खूप चांगली आहे, पण संघर्षाच्या काळातील 'ते' दिवस ते आजही विसरलेले नाहीत. भूतकाळाची जाण आणि भविष्यकाळाकडे नजर ठेवतो तोच जीवनात मोठा होतो, असं थोरा-मोठ्यांनी म्हटलेलं आहेच. रमेश खानविलकर त्याचं जिवंत उदाहरण आहेत. आज त्यांच्या घरी दिवाळी मोठ्या थाटात साजरी केली जाते, पण दोन वेळच्या अन्नाला मोताद असतानाचे 'ते' दिवस त्यांना आजही आठवतात. अत्यंत हालाखीच्या दिवसातील 'ती' दिवाळी आजही त्यांच्या चांगलीच स्मरणात आहे. दिवाळीच्या दिवशी खायला धड अन्नही नव्हते, फराळ तर दूरची गोष्ट होती... त्या दिवसातील झोपडीतील आपल्या दिवाळीबाबत सांगताहेत रमेश खानविलकर...

लेख पृष्ठ क्र. ५९ वर

Scanned with CamScanner

# सारी सुखं विसावली या झोपडीत माझ्या

- रमेश खानविलकर



आजच्या झगमगाटाचा व कृत्रिम प्रेमाने बहरलेला दिपोत्सवा पाहिल्यानंतर मला माझ्या ४० वर्षांपूर्वीच्या छोट्याशा झोपडीतील घरात कोणताही गोडधोड पदार्थ न करता, सर्व भांडी उपडी ठेवून साजरी केलेली विना फराळाची दिवाळी आजहि आठवते. माझं घर ज्या घरात आजहि जगातील सारी सुख हात जोडुन उभी असतात. माझं घर मी जेव्हा १०/१२ वर्षांचा होतो, कुडयाच्या भिंती व त्या भिंतीवर चाळण झालेले लोखंडाचे पत्रे, उन्हाळयात त्या होल असलेल्या व चाळणी झालेल्या पत्र्यामधून दिवसभर छानसा प्रकाश पडायचा व पौर्णिमेला चांदण्यांचा प्रकाश व पावसाळयात अनेक ठिकाणी पाणीच पाणी. मुसळधार पावसाळयात झोपडीत पाणी पडत असल्याने मग घरातील पोक आलेली भांडी टपटप पडणाऱ्या पाण्याच्या ठिकाणी लावायची. त्यात आकाशातून पडलेले पाणी आम्ही साठवायचो व त्या भांडयात साचलेले पाणी टाकण्यासाठी रात्रभर जागरण! आजहि ते क्षण आठवतात. पण आठवते ती दिवाळी. वडिलांच्या कंपनीचा संप, त्यामुळे ते कोठेही कामाला नसायचे व कोठे तात्पुरते असले तर ४०० ते ४५० रूपये पगार! संपकाळात आलेली दिवाळी, ती येण्यापूर्वीच संप सुरू असल्याने घरात काहिच धान्य नव्हतं! आई कोणाकडेतरी धुणीभांडी करायची व ज्याच्याकडे धुणीभांडी करायची ते लोक शिळंपाक असलेले अन्न दयायचे, त्या शिळंपाक अन्नावर आमची गुजराण व्हायची. ४० वर्षांपूर्वीची कुडयाच्या भिंती असलेली आमची श्रीमंत झोपडी दिवाळीच्या अगोदर घरात भलंहि काहीच नसो. पण गाईच्या गोठयात जावून शेण आणून ती झोपडी सारवायची व घराच्या समोर माती आणून टाकायची. त्यानंतर त्या शेणाने सारवलेल्या अंगणात झोपण्याची व बाहेर बसण्यासाठी मस्तपैकी मातीचे अंगण बनवायचे, ते दर तीन चार दिवसाने शेणाने सारवायचे व चांदण्या रात्री त्याच अंगणात झोपायचे. झोपल्यावर वरती मस्तपैकी चांगण्याचे व चांदोबाचे छत असायचे.

अशीच एकदा दिवाळी आली. संपामुळे घरात धान्य नव्हते. वडिल नोकरी शोधत होते. पण दिवाळीपूर्वी कोणी नोकरी पूर्वी देत नसे. कारण कामगाराला बोनस व मिठाई दयावी लागे.

आई आजारी असल्याने तिचे घरकाम सुटलं होतं. आई आमची अतिशय साधी पण देवावर प्रचंड विश्वास असणारी. तिने मला लहानपणापासून देवाची भक्ती करून शक्ती मिळविण्याचा कानमंत्र दिला होता म्हणून ८/१० वर्षांचा असताना मी व आई दर शुक्रवारी जगतमाता माँ संतोषीमातेची व सिद्धिविनायकाची उपोषणा करायचो. कारण सिद्धिविनायक व संतोषी माता हे बहिणभाऊ आहेत असे पुराणात आहे असे कोणीतरी सांगितले होते. दोघेही कडक उपवास करायचो व त्या देवीसमोर दिवा लावायला तेल हि नसायचे. मग देवळात जावून तेलाची पणती उचलून आणायची ती समोर ठेवायची. दररोज सकाळी ५ वाजता उठून देवाची पुजा किमान २ तास पोथी पुजा व वाचन करायचो. दर शुक्रवारी माँ संतोषी मातेची पुजा व पोथी निश्चितपणे असायची. श्रावणात सोमवार, शुक्रवार, शनिवार माझी झोपडी परमेश्वराच्या भक्तीरसाने बहरून निघायची. तो दिनक्रम आजही ४० वर्षांनंतरही सुरूच आहे. घरात धान्य नसल्याने तर उपवास अनेक वेळा व्हायचे. त्यामुळे उपवास म्हणून वेगळे काही वाटायचे नाही. देवाची सकाळी पुजा अर्चा करून शाळेत जायचे. दुपारी घरात आल्यावर घरचा अभ्यास करून आईला मदत करायची अशी दिनचर्या असायची. अशा अवस्थेत एकदा दिवाळी आली. घरात धान्याचा कण नव्हता. सर्वांकडे फटाके वाजत होते. सर्वांच्या घरात गोडधोड बनवले जात होतं. कुठे करंज्या, कुठे लाडू, कुठं कापण्या, कुठं चकल्या बनविण्याची घाई सुरू होती. ते ज्या घरात बनवले जात होत, तेथुन त्या पदार्थाचा सुगंध घरात बसु देत नव्हता. पण लहानपणापासून माझे आईवडिल स्वाभिमानी. इतरांच्या घरात सोनं असलं तरी जायचं नाही त्याला हातहि लावायचा नाही.

Scanned with CamScanner




नुकतीच सोनाराने भट्टीतून बाहेर काढल्याप्रमाणे. मी ती अंगठी आणून अण्णांकडे दिली. अण्णा ती अंगठी सोनाराकडे घेऊन गेले तर सोनार म्हणाला अहो आजच बनविली का? अंगठी १०० टक्के सोन्याची असुन अजिबात मिलावट नाही. असं सोनं शोधुन सापडत नाही. कोणाकडे बनविलीत हि अंगठी. वडिल गप्प राहिले. मी सोबतच होतो. आम्ही ती अंगठी त्या सोनाराकडून परत घेतली व घरी आलो. वडिलांनी व आईने मला घरात बसवून १० वेळा विचारले की अंगठी कोठे सापडली? कोणाच्या घरातुन तर घेतली नाहीस ना? मग मी त्यावेळी घडलेला सर्व प्रसंग सांगितला. तरी अण्णा आईचा विश्वास बसत नव्हता. म्हणून त्यांनी ती अंगठी घरातच ठेवली व अनेकांना विचारणा केली कि कोणाचे काही हरवलं आहे का? पण दोन दिवस कोणीच काही बोलत नाही म्हटल्यावर मला ज्या जागेवर अंगठी सापडली तेथे अण्णांना घेवून गेलो. त्यांना मी ती जागा दाखविली व त्यानंतर अण्णांनी ती अंगठी सोनाराला विकली. तेव्हा त्या अंगठीचे ७०० रुपये मिळाले व दिवाळीची भाऊबीज, आमच्या घरात तेल, मिठ, मसाला, गहू, तांदुळ, साखर, चहा पावडर असे २ महिन्यांचे सामान भरुन झाले. आजहि दिवाळीचा सण जेव्हा जेव्हा असतो तेव्हा तेव्हा मला त्या अंगठीची आठवण आजहि चाळीस वर्षानंतरही येते. मी चाळीस वर्षांपूर्वी ज्या संतोषी मातेचा फोटो लावून पुजा अर्चा पोथी करायचो, त्या फोटोसमोर आजही चाळीस वर्षानंतरही नित्यनेमाने व तेवढयाच श्रद्धेने पुजा अर्चा करतो. चाळीस वर्षांपूर्वी असलेला माता संतोषी मातेचा फोटो आजही पूर्वीसारखा माझ्या देवघरात तेजस्वी आहे. आज चाळीस वर्षानंतर मी पंचवीस हजाराची मिठाई अनेकांना वाटतो. पण आठ आण्यात साजरी केलेल्या दिवाळीचा आनंद आजही मला सतत प्रेरणा देत असतो. दिवाळीच्या पहिल्या दिवशी आजही ज्या ठिकाणी अंगठी सापडली होती तेथे न चुकता जातो.

आजच्या दुनियेत वावरत असताना मला कविवर्य भट्ट यांची खालील कविता आठवते. कारण कविवर्य भट्टांनी माझ्या सत्यपरिस्थितीवर हि कविता केली असावी असे वाटते.

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या ॥ १ ॥
भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या ॥ २ ॥
पहारे आणि तिजोऱ्या, त्यातूनी होती चोऱ्या
दाराल नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या ॥ ३ ॥
जाता तया महाला, 'मज्जाव' शब्द आला
भीती न यावयाला, या झोपडीत माझ्या ॥ ४ ॥
महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
अम्हां जमीन माने, या झोपडीत माझ्या ॥ ५ ॥
येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोजा, या झोपडीत माझ्या ॥ ६ ॥
पाहून सौख्य माझे, देवेंद्र तोही लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या ॥ ७ ॥
'तुकडया' मती करावी, पायी तुझ्या नमावी
मूर्ती तुझी रहावी, या झोपडीत माझ्या ॥ ८ ॥

आजही त्याच झोपडीत सुधारणा केलेल्या घरात मी रहातो. आजच्या स्थितीत मी मोठया घरात किंवा मोठया इमारतीमध्ये रहाण्यास जावू शकतो. तशी आर्थिक स्थिती देवाच्या कृपेने चांगली आहे. मोठे घर ही घेवून ठेवली आहेत. पण त्या मोठया घरात मी रहायला जात नाही. आजही त्याच माझ्या झोपडीत मी रहातो. आज शिक्षण संस्थेचे कामकाज प्रचंड वाढलेले आहे. शिवाय विविध सामाजिक, शैक्षणिक संस्थेच्या व महाराष्ट्र शासनाच्या विविध समितीवरच कामकाज. उदयोग व्यवसाय हे सर्व करण्यात दिवसाचे १८/१९ तास घालवल्यानंतर किंवा महाराष्ट्रात कोठेही प्रवास केल्यानंतर या झोपडीत आल्यावर मला सर्व ताण, क्षीण ताबडतोब नष्ट होवून दुसऱ्या दिवशी एक वेगळी शक्ती हि झोपडी माझ्यात निर्माण करते व नवीन कामाचा जोम निर्माण करते.

आज चाळीस वर्षात मी कधीही कोणाही नातेवाईक, मित्रमंडळी यांच्याकडे कधीच जेवलो नाही व कितीही आग्रह झाला तरी जेवतही नाही. मुंबईच्या बाहेर असताना अनेक








बैठकीच्या माध्यमातून पंचतारांकित हॉटेलमधून जेवणाचा प्रसंग येतो. पंचतारांकित हॉटेलमध्येही जेवणाचे पैसे मला कधीही देण्यास लागले नाही. पण कुतूहल म्हणुन मी व माझ्या सोबतचे जे कोणी जेवले त्याचे बिल किती झाले यांची विचारणा करतो. तेव्हा ते बिल २५/३० हजाराच्या आसपास असते. त्या पंचतारांकित हॉटेलमध्ये जेवल्यानंतर माझे पोट कधीच भरलेले नाही. म्हणुन मी त्या पंचतारांकित हॉटेलमध्ये झुणकाभाकरीची ऑर्डर देतो. पण त्या प्रवासातून ज्या दिवशी घरी येतो तेव्हा घरी फोन करून अगोदरच सांगितलेले असते घरी जेवायला येणार! मग रात्री दोन/तीन वाजले तरी घरीच जावून जेवायचे, मुंबईत कोठेही असलो व कितीही उशीर झाला व सोबतच्या लोकांनी कितीही आग्रह केला तरी त्यांच्यासोबत पंचतारांकित हॉटेलमध्ये जायचे. त्यांना कंपनी दयायची. पण जेवण मात्र घरी येऊनच जेवायचो. आजही सर्वात आवडता पदार्थ माझा चपातीवर मसाला-तेल टाकुन मसाला चपाती खाणे आहे.

माझ्या झोपडीत शक्ती आहे ती मला नेहमी नवचैतन्य देत असते. घरी रात्री-बेरात्री आल्यावर घरातील चपाती-भाजी, भात-डाळ खाल्ल्यावर मन तृप्त होते व पटकन शांत झोप या झोपडीत मला लागते. ती शांत झोप मला पंचतारांकित हॉटेलमध्ये कधीच लागली नाही. माझी झोपडी म्हणजे माझ्या आईची कुशी आहे. माझी झोपडी म्हणजे माझ्यासाठी माझ्या परमेश्वराची मांडी व सुरक्षाकवच आहे. तेथे आल्यावर मला सुरक्षित वाटते व क्षीण विरहित करते व दुसऱ्या दिवशी कामाला नवप्रेरणा देते. पण एक खंत मात्र सतत दिवाळीत असते ते म्हणजे आजचं वैभव बघण्याकरीता माझे अण्णा नाहीत व आनंद अशासाठी आहे कि माझा परमेश्वर भक्तीचा वारसा माझी दोन्ही मुलं देखील लहानपणापासूनच जोपासत आहेत.

पण घरात कोणी पाहुणा आला! तर! मात्र घरात धान्याचा कणहि नसला तरी उसणवार किंवा भांडी गहाण ठेवून आलेल्या पाहुण्याचा पाहुणचार करण्याचा स्वभाव असलेले! हां तर आदल्या दिवशी सर्व घरात दिवाळीची जोरदार तयारी सुरू असताना आमच्या घरात काहिहि नव्हतं पण घरात मात्र आई, अण्णा, मी व भावंड होतो. धाकटी भावंडे लहान असल्याने त्यांना परिस्थितीची जाण नव्हती व आम्ही तिघं मात्र त्या दिवशी घरातून बाहेर पडलो नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी दिवाळीच्या दिवशी सर्व घरात अभ्यंगस्नान सुगंधी उठणं लावून नवे कपडे घालुन आजुबाजुला सर्व लगभग सुरू होती. आम्ही मात्र आमच्या झोपडीतून दरवाजा उघडून बाहेरही आलो नाही. मी, अण्णा, आई एकमेकांच्या तोंडाकडे बघत होतो. धाकटी भावंडं झोपली होती. आईने राखून ठेवलेले आठ आणे काढले



व ४ आण्याची साखर, २ आण्याची पावडर, २ आण्याचे बटर आणायला मला पाठवले. आठ आण्यात साखर, बटर, पावडर आली. आईने दरवाजा उघडला. बाहेर तिन विटाची चुल होती. त्याच्यामध्ये लाकडे टाकली व चुलीवर मस्तपैकी कोरा चहा केला आणि आम्हा भावंडाना दोन बटराचे अर्धे-अर्धे भाग करून कुटलेल्या कपात चहा देवून त्या कोऱ्या चहात तो अर्धा बटर बुडवुन आम्ही दिवाळीच्या पहिल्या दिवसाची पहाट साजरी केली. त्यानंतर विना उटण्याची साध्या गार पाण्याने आंघोळ करून शाळेचे फाटके कपडे घालून मस्तपैकी दिवाळी साजरी केली.

सर्व घरातील लोक अभ्यंगस्नानानंतर फराळ घरा-घरात एकमेकांना देत होते. आम्ही भावंड आमच्या घरात कोण कधी फराळ आणुन देतोय काय? याची वाट पहात होतो. पण सर्वात गरीबाची झोपडी म्हणून अनेकजण गावाबाहेरची झोपडी प्रमाणे वागणुक देत असत. अशा वेळी कोणीतरी व्यक्तीने आमच्या झोपडीत फराळाचं ताट पाठवलं! आम्ही भावंडं अधिरतेने ताटाकडे बघु लागलो. आईने ते फराळाचं ताट घेतलं व लाकडाच्या मांडणीवर ठेवलं व त्या फराळावर झाकण म्हणून टोप ठेवला व आम्हाला म्हणाली थांबा! तुम्हाला नंतर देते! तेवढयात माझे मोठे काका नाना गावावरून आले. ते सुद्धा त्याच दिवाळीच्या पहिल्या दिवशी! घरात नाना आले म्हणून माझ्या वडिलांची म्हणजे अण्णाची व आईची लगबग सुरू झाली ती पाहुणचार करण्यासाठी. घरात तर खायला काहीच नाही? फराळ केला नाही! आपली मुलं दोन दिवस उपाशी आहेत.

आज दिवाळीचा पहिला दिवस, पोरांनी अर्धा बटर व कोरा चहा सकाळी खाऊन साजरा केला. या सर्व गोष्टी लपविण्यासाठी त्यांची सर्व धडपड चालू झाली. पण नाना आमचे मोठे चुलते पोलीस अधिकारी असल्याने हि बाब त्यांच्या लक्षात आली. त्यांनी आईला विचारले काय गं! शारदा (आईचे नांव) घरात पोरांना फराळ केला नाहिस! वडिलांना विचारलं, "श्रीरी (वडिलांना नाना श्रीरी म्हणत) काय रे! काय झालं? कोणता फराळ केला शारदाने?" वडिल काही उत्तर देण्यापूर्वीच आई आपली फाटकी साडी सांभाळत म्हणाली, "अहो! हे काय लाडू, चकल्या, करंज्या बनवलाय!! चव तर घ्या!" असे बोलून कोणीतरी आणून दिलेलं फराळाचं ताट आईने नानांसमोर ठेवलं. नाना त्या भरलेल्या फराळाच्या ताटाकडे आसुसलेल्या भुकेल्या नजरेने बघत होते व मी व माझी भावंड देखील त्या भरलेल्या ताटाकडे बघत होतो. आम्ही त्या फराळाकडे बघत आहोत हे पाहिल्यावर नानांनी मला व भावंडांना "ओ' घ्या कि थोडं" म्हणुन ताट आमच्यासमोर केलं आमचे हात पुढे जाणार! तेवढयात आई पुढे सरसावली, म्हणाली, "अहो नाना! कालपासून सारखे फराळाचं खातायत पोरं. त्यांना नका देवू नाहीतर पोट बिघडलं तर पंचाईत. तुम्ही घ्या!" नाना सकाळीच गावाकडून आल्याने त्यांनी तो फराळ फस्त केला. ते आम्हाला त्या ताटातील देण्याचा प्रयत्न करत होते. पण आम्ही त्या फराळाला हातही







शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धव ठाकरे आणि मुलगा रिद्धेशसोबत रमेश खानविलकर.

लावला नाही. नानांचा फराळ झाला व नाना निघाले. जाताना नानांच्या पाठोपाठ मी निघालो. आशा होती की नाना काहीतरी पैसे देतील. कारण पुर्वी पाहूणा आला कि निघताना लहान मुलांच्या हातावर पैसे ठेवुनच जायचा। नानांसोबत बाहेर पडलो. आई मला अडवत होती. नको जावू म्हणत होती. मी पण हट्टाने नानांसोबत सोडायला येतो म्हणून मुद्दाम चालायला लागलो. आशा होती चार आणे किंवा आठ आणे भेटले कि संध्याकाळी पाव किलो तांदूळ आणून घरात कमीत कमी भात तरी होईल. म्हणून नानांबरोबर चालत चालत पुढे पुढे निघालो. थोडे अंतर चालल्यानंतर नानानी आठ आण्याचे नाणं बाहेर काढून माझ्या हातावर ठेवलं आणि म्हणाले "रमेश खरंच शारदाने फराळ केला होता?" तेव्हा मी नानांना उत्तर दिले की, "अहो नाना गेले तीन दिवस आम्ही तेच फराळाचे काम करतोय!" तेव्हा नानांची खात्री झाली की, आमच्याकडे फराळ केला होता. अशा तऱ्हेने आमच्या झोपडीची रितच न्यारी होती. घरात अन्नाचा दाणा पण नसे तरीही आलेला पाहूणा कधीच उपाशी गेला नाही. नानाने दिलेले आठ आणे घरी येवून आईकडे दिले. आईने त्या आठ आण्याचे तांदूळ व तिखट मसाला पावडर आणली व संध्याकाळी ते आणलेले तांदूळ चुलीवर शिजायला ठेवून त्यात मसाला पावडर व मीठ टाकून मस्तपैकी मसाला भात केला. आम्ही सर्वांनी आई, अण्णा, मी व भावंडांनी मसाला भात खाऊन दिवाळीचा पहिला दिवस साजरा केला व चांदण्याचे छत असलेल्या अंगणात मस्तपैकी झोपी गेलो. अतिशय सुखासमाधानाने दुःखाचा लवलेशही नव्हता.

दुसऱ्या दिवशी शुक्रवार होता. नेहमीप्रमाणे सकाळी उठून शुक्रवारची पुजा व पोथी झाली. पहिल्या दिवसाची व्यवस्था आठ आण्याने केली होती. दुसऱ्या दिवशी पुन्हा ठणठणाट. पण पुजा अर्चा झाल्यावर शुक्रवारी आईने माँ संतोषी मातेचे व्रत मनोभावे केल्यानंतर आईने संतोषी मातेकडे अश्रुनयनाने हात जोडून त्या ९/१० वयाच्या माझ्या मुलांना असलेल्या परिस्थितीवर मात करण्याची शक्ती दे! असा वर मागितला. पैसा नाही, धनधान्य नाही. घर नाही. बंगला नको. पण शक्ती दे असे बोलून पुजा संपवली व बाहेर पडलो आणि खरंच चमत्कार किंवा अंधश्रद्धा नाही किंवा आतिशयुक्ती नाही. सहज बाहेर पडतो व चालत मोकळ्या मैदानाकडे जात होतो. मनात आज कोण फराळ आणून देणार कि दोन्ही वेळ उपवास होणार असा विचार सुरू होता. तेव्हा मैदानात एका ठिकाणी उंचवटा दिसला. बालपण असल्याने सहज त्या उंचवट्याला लाथ मारली. त्या उंचवट्यामधून मातीची धुळ सर्व ठिकाणी उडाली व माझ्यासमोर चकमकित एक वस्तु चकाकु लागली. मी ती वस्तू उचलली. ती होती सोन्याची जाडजुड कोरी करकरीत अंगठी. मला वाटली ती नकली अंगठी असेल. पण एवढी चकमकीत व कोरी अंगठी जणू काय

